# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. (०२२) २६४७१२५५ (का.) फॅक्स क्र. (०२२) २६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/VLC/२०११/ 11490 दिनांक - 16 DEC 2011

प्रति,

प्राचार्य,

शा.तं.नि.आर्वी, वाशिम, गडचिरोली, धुळे, जितूर, बीड, मिरज, सोलापूर, तासगांव, मुंबई, रत्नागिरी, मालवण, अकोला, हिंगोली, अंबड, गोंदीया, नंदुरबार, अवसरी, जालना

भारती विद्यपीठ इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, नवी मुंबई / इन्स्टिटयूट ऑफ सिव्हील अँड रुरल इंजि., गारगोटी, कोल्हापूर/ पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक, पुणे/ जे.टी.महाजन पॉलिटेक्निक, फैजपूर, जि.जळगाव, मनोहर फाळके पॉलिटेक्निक, मुंबई/ श्री सावित्रीबाई फुले वुमेन्स पॉलिटेक्निक, पुणे, डॉ.एन.पी.हिरानी इन्स्टिटयूट, पुसद/ गुरुगोविंदसिंहजी पॉलिटेक्निक, नाशिक

**विषय : VLC संदर्भात मंडळाच्या सभागृहात होणाऱ्या बैठकीबाबत.....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, VLC संदर्भात VLC Co-ordinators यांची खालील मुद्यांवर चर्चा करण्यासाठी दि. २७/१२/२०११ रोजी स. ११.०० वा. संचालकांच्या अध्यक्षतेखाली मंडळाच्या सभागृहात बैठक आयोजित केलेली आहे.

१. म. रा. तंत्र शिक्षण मंडळाने VLC हा प्रकल्प २००६-०७ मध्ये सुरु करण्यात आला. पहिल्या टप्प्यामध्ये एकुण १० तंत्रनिकेतनांमध्ये कार्यान्वयित करण्यात आला. YCMOU यांच्या Studio मधुन व्याख्याने आयोजीत करुन प्रसारीत केली जात होती. व्याख्यान आयोजन करण्याची कार्यवाही VLC साठीच्या प्रकल्प संस्थांमार्फत केले जात होते. त्यावेळी असे निदर्शनास आले आहे कि, या १० संस्थांपैकी काही संस्था मधील व्याख्यानाच्या वेळी VLC Center उघडले जात नव्हते. त्याच बरोबर जी Centers चालू केली जात होती तेथे माईक बिघडणे, प्रोजेक्टर चालू नसणे, अॅम्प्लीफायरचा आवाज निट न येणे, UPS चालू नसणे किंवा बॅटरी डिसचार्ज असणे, विद्यार्थ्यांना व्याख्याना विषयी पूर्व कल्पना दिलेली नसणे, व्याख्यानाच्या वेळी अपूरी संख्या असणे, Coordinator वेळेवर हजर नसणे, Coordinator नेमलेला नसणे अशा बाबी प्रकर्षाने निदर्शनास आल्या आहेत व त्यामुळे विद्यार्थ्यांना या योजनेचा पुरेपुर लाभ व्हावा या, दृष्टीने प्राचार्यांनी या बाबत स्व:त लक्ष घालणे आवश्यक आहे.

२. आपल्या VLC Center च्या UPS ची बॅटरी नादुरुस्त झालेली असल्यास/बदलावयाची असल्यास तसे प्राचार्यांचे पत्र बैठकीच्या दिवशी सोबत आणावे. तसेच आपल्या अन्य अडचणी असल्यास त्या बैठकीत निदर्शनास आणाव्यात.

३. म. रा. तंत्र शिक्षण मंडळाने दुस-या टप्प्यात VLC प्रकल्पाचा विद्यार्थ्यांना उपयोग होण्यासाठी नवीन सतरा संस्थांमध्ये VLC Center प्रस्थापित करण्याचे काम सुरु आहे. वरील सर्व संस्थाच्या प्राचार्यांनी समन्व्ययकाची नियुक्ती करुन त्यांना बैठकीस पाठवावे. तसेच VLC Center झालेनंतर ते व्यवस्थित चालेल व त्यांचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना फायदा होईल याची दक्षता घेणे आवश्यक राहील.

प्राचार्यांनी VLC Center साठी नेमलेल्या समन्व्यकांची बैठकी मध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा करून कार्यवाही ठरवावयाची आहे. याकालावधीत संबंधीतास परिक्षेचे किंवा इतर काम दिले असल्यास पर्यायी व्यवस्था करून बैठकीस प्रतिनियुक्त करावे. समन्व्यकांनी बैठकीस येताना वरील मुद्द्यांबाबत आवश्यकती माहिती सोबत आणावी.

*VLC सुविधा कार्यक्षमतेने राबविणेचे दृष्टीने उपाय योजना ठरविणे*

- *समन्वयकांच्या VLC Center च्या बाबतीत येणा-या अडचणी बाबत चर्चा करणे.*
- *VLC सुविधांचा जवळपासच्या संस्थांतील विद्यार्थ्यांना लाभ उपलब्ध करुन देणेबाबत धोरण ठरविणे.*
- *VLC Center चा कार्यक्षमतेने वापर करणेबाबत धोरण ठरविणे.*
- *विद्यार्थ्याला प्रोत्साहनात्मक उपाययोजना (उदा. चांगल्या प्रश्नास म्हणून बक्षीस इ.)*

(डॉ. प्र. मं. खोडके)
संचालक,
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत : १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी सादर.